# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त कार्यालय**

मुख्यालय, २ रा मजला,स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र. २८१९२८२८
ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

**जा.क्र.मनपा/आयुक्त/४४/२०२५-२६** **दि.२९/०७/२०२५**

## कार्यालयीन आदेश

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १६/०७/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत महानगरपालिकेमध्ये करण्यात येणारी नवीन विकास कामे ही महानगरपालिकेच्या मालकीच्याच जागेवर करण्याबाबत व संपूर्ण जागा ताब्यात आल्याशिवाय त्या जागेवरील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येऊ नये अशा सक्त सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व विभागांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, पाणीपुरवठा व मलनिस:रण विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, घनकचरा व्यवस्थापन (प्रकल्प), उद्यान विभाग इत्यादी विभागामार्फत नवीन विकास कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केले जातात. शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कोणतेही विकास काम महानगरपालिकेच्या मालकीच्याच जागेवर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सर्व विभागांनी कोणतेही विकासकाम प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करताना जागेच्या मालकीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावामध्ये जागेच्या मालकीबाबतच्या रकान्यामध्ये स्पष्टपणे जागा महापालिकेच्या मालकीची आहे असे नमूद करावे.

२) तसेच प्रस्तावासोबत जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याबाबतची कागदपत्रे उदा.७/१२ उतारा/प्रॉपर्टी कार्ड किंवा मालकीबाबतचे अन्य दस्ताऐवज जोडून प्रस्ताव सादर करावा.

३) जागेच्या मालकीबाबत सक्षम प्राधिकारी हे स्थावर मालमत्ता विभाग (Estate Department) असल्याने त्याच्या अभिप्रायासह व मालकीबाबत स्पष्ट अभिप्राय असतील असेच नवीन प्रस्ताव, प्रस्ताव तपासणी समितीकडे व आयुक्त यांच्याकडे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करावेत.

४) विकास योजनेतील अनुज्ञेय आरक्षणाबाबत सहाय्यक संचालक, नगररचना यांचे नस्तीवर प्रथम स्वयंस्पष्ट अभिप्राय घेऊनच नस्ती प्रस्ताव तपासणी समितीपुढे व आयुक्त यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावी.

५) सी.आर.झेड (MCZMA), कांदळवन कक्ष, वन विभाग, सॉल्ट विभाग, इको सेन्सिटीव्ह झोन इत्यादी बाधित क्षेत्रात विकास कामे करताना संबंधित विभागाची मान्यता मिळाल्याखेरीज कोणताही प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करु नये.

६) राज्य शासन, केंद्र शासन यांच्यामार्फत प्राप्त होणाऱ्या निधीमधून करण्यात येणाऱ्या कामांसाठीही वरीलप्रमाणे कार्यपध्दती लागू राहील.

वरील प्रमाणे शहर अभियंता यांनी प्रस्ताव स्थावर मालमत्ता विभाग / नगररचना विभाग यांच्याकडे प्रस्ताव सादर करुन त्यांच्या अभिप्रायासह प्रस्ताव तपासणी समितीकडे सादर करावा व त्यानंतर लेखा व लेखापरीक्षण विभागामार्फत आयुक्त यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.

भविष्यात जागेच्या मालकीबाबत काही वाद किंवा तक्रार झाल्यास संबंधित विभागप्रमुख जबाबदार असेल याची नोंद घ्यावी.

(राधाबिनोद शर्मा)
**आयुक्त तथा प्रशासक भा.प्र.से.**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

**१) अति. आयुक्त १ व २**
**२) सर्व उपायुक्त / विभागप्रमुख / खातेप्रमुख**
**३) अध्यक्ष / सदस्य, प्रस्ताव तपासणी समिती**